# 'सीएसआर'मधून 'ससून'चा कायापालट

Mustafa.Attar
@timesgroup.com

**पुणे :** प्रत्येकवेळी सरकारने सुविधांसाठी निधी द्यावा, या आशेवर असलेल्या व्यवस्थेला ससून प्रशासनाने मोठा धडा घालून दिला आहे. 'इच्छा असेल तर मार्ग सापडतो' या उक्तीप्रमाणे पुण्याच्या परिसरातील विविध कॉर्पोरेट कंपन्यांच्या सामाजिक बांधिलकीतून (सीएसआर) मिळणाऱ्या निधीचा 'बूस्टर' मिळविण्यात यश मिळविले. ससून हॉस्पिटलचा कायापालट करताना गरिबांना अद्ययावत उपचार देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ससूनचे 'सीएसआर मॉडेल' आता राज्यात राबविल्यास सरकारच्या तिजोरीवरील बोजा कमी होण्याची शक्यता आहे.

सरकारी हॉस्पिटल म्हटले, की तेथे सुविधांची वानवा असते, असे आतापर्यंतचे चित्र. त्या ठिकाणी डॉक्टर उपलब्ध असले की औषधे मिळत नाहीत. औषधे मिळाली, तर बाकीच्या सोयीसुविधांचा अभाव असतो. त्यामुळे दूरवरून येणाऱ्या पेशंटना खासगी हॉस्पिटल, दवाखान्यांची पायरी चढण्याशिवाय पर्याय नसतो. याच कारणास्तव कित्येक वर्षांपासून सातत्याने सरकारी हॉस्पिटलवर समाजातील विविध स्तरांतून टीका होत आली आहे. ससून हॉस्पिटलदेखील याच टीकेतून तावून सुलाखून निघाले आहे. अनेकदा पेशंट, समाजातील विविध स्तरातील संस्था, व्यक्तींसह माध्यमांनी देखील टीकेची झोड उठविली होती. परंतु, त्याचे फलित म्हणा ससूनला आता 'अच्छे दिन' येत आहेत, असे म्हणायला हरकत नाही. कारण ससूनला आता कॉर्पोरेट कंपन्यांच्या निधींचा 'बूस्टर' मिळू लागला आहे. त्यामुळे हॉस्पिटलचा चेहरामोहरा बदलू लागला आहे.

गेल्या तीन ते चार वर्षांमध्ये ससून 'कॅम्पस मेकओव्हर'चे काम सध्या सुरू आहे. त्याअंतर्गत ससून हॉस्पिटलमधील विविध वॉर्डांचे नूतनीकरण करण्यात आले. त्यासाठी श्रीमंत दगडूशेठ गणपती हलवाई ट्रस्टने पुढाकार घेत रसद पुरविण्यास सुरुवात केली. ट्रस्टने निधीचा श्रीगणेशा केल्यानंतर अनेक कंपन्यांनी ससूनकडे 'सीएसआर' निधीतून मदत देण्यास हात पुढे केला. त्यासाठी ससूनच्या प्रशासनाचे अर्थात अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले यांचे प्रयत्न आहेत. 'गरिबांसाठी चांगले हॉस्पिटल तयार करायचे' या हेतूने डॉ. चंदनवाले यांनी केलेल्या प्रचारामुळे त्यांना निधी देण्यास कोणीही मागे फिरलेले नाही.

बँक ऑफ बडोदाने दिलेल्या १५ लाख रुपयांच्या मदतीने 'ह्युमन मिल्क बँक' ससून हॉस्पिटलमध्ये उभारण्यात आली. आवारातील मोकळ्या जागेत पेशंटच्या नातेवाइकांसाठी बसण्यासाठी शेड उभारण्यासाठी ८० लाख, किचनसाठी एक कोटी ५० लाख, वॉर्डच्या नूतनीकरणासाठी एक कोटी २० लाख रुपयांची मदत दगडूशेठ गणपती ट्रस्टने दिली. त्याशिवाय गरीब पेशंटना चांगल्या दर्जाचे अन्न मिळावे यासाठी दरमहा २० लाख रुपयांचा खर्च होत आहे. सप्टेंबर २०१३ पासून हा खर्च करण्यात येत आहे.

नॅशनल इन्शुरन्स, कंपनी, फिनोलेक्स कंपनी, कमिन्स, सुझलॉन, पर्सिस्टंट, सिस्का एलईडीसारख्या विविध कंपन्यांच्या 'सीएसआर' निधीतून मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झाला आहे. त्यातून नुकतेच नवजात अर्भकांना जीवदान देण्यासाठी अद्ययावत 'एनआयसीयू' उभारण्यात आला. त्याशिवाय आता डायलिसिस सेंटर, कलर डॉप्लर मशीन यासारख्या सुविधांसाठी कंपन्यांनी मदतीचा हात पुढे केला आहे. अकरा मजली इमारतीतील नेत्ररोग, बालरोग, अस्थिरोग विभागासाठी बँक ऑफ न्यूयॉर्कसारख्या संस्थेनेदेखील मदत दिली. या आणि अशा विविध संस्था संघटना, कंपन्यांच्या मदतीने ससूनमध्ये चांगल्या सोयी सुविधा होत आहेत. चांगल्या उपचाराची यंत्रणा येऊ लागली आहे. भविष्यात अशाच 'सीएसआर'च्या माध्यमातून ससून हॉस्पिटलचा कायापालट होत राहील, अशी अपेक्षा आहे.

गेल्या तीन वर्षांत ससून हॉस्पिटलला सीएसआरच्या माध्यमातून सुमारे ४० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. आणखी काही निधी येणे अपेक्षित आहे. या निधीच्या माध्यमातून ससूनसारख्या सरकारी हॉस्पिटलचा चेहरामोहरा बदलतोय ही समाधानाची आणि चांगली बाब म्हणावी लागेल. परंतु, त्याचा सामान्य गरीब पेशंटना निश्चित फायदा व्हावा, अशी माफक अपेक्षा आहेच. त्याशिवाय प्रत्येक विकासकामांना सरकारकडे हात पसरविण्याची गरज देखील नसल्याचा धडाच ससून हॉस्पिटलने इतर सरकारी हॉस्पिटलला दाखवून दिला हे मान्य करावे लागेल. राज्यातील अन्य सरकारी हॉस्पिटलला अशाच प्रकारे सीएसआरच्या माध्यमातून निधीचा बूस्टर मिळाला, तर निश्चितच सरकारी आरोग्य सेवेचा विकास होईल. त्याशिवाय गरिबांना खासगी हॉस्पिटलकडे जाण्याची गरज राहणार नाही, अशी आशा वाटते.

**सरकारी-खासगी भागीदारीतून चांगल्या उपचारांची ग्वाही**

**मटा विश्लेषण**

### निधी घ्या, पण पारदर्शकता हवी!



ससून हॉस्पिटलची प्रतिमा आता बदलत आहे. हॉस्पिटलच्या सोयी सुविधांसाठी विविध कंपन्या 'सीएसआर'च्या माध्यमातून निधी देत आहे. त्या निधीचा निश्चित योग्य वापर होत असल्याचे आता तरी दिसत आहे. परंतु, हा समाजाचा, दानशूर व्यक्तींचा अथवा त्यांच्या कंपन्यांचा पैसा आहे. तो त्यांचा असला तरी ससून हॉस्पिटल त्याला जबाबदार आहे. त्यामुळे ससूनला मिळणाऱ्या प्रत्येक निधीचा वापर पारदर्शकपणे आणि योग्य कामासाठी खर्च व्हावा, अशी अपेक्षा देणगीदारांनी केली तर त्यात गैर नाही.